रयत शिक्षण संस्थेचे

# आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) ता. पलूस जि. सांगली



## *अर्थशास्त्र विभाग*

दि. 24 / 02 / 2020

## ग्रामपंचायत पुणदीस अभ्यास भेट

दि. 24 फेब्रुवारी 2020 रोजी आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली) महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुणदी गावच्या ग्रामपंचायत कार्यालयास अभ्यास भेट दिली. या अभ्यास भेटीचे प्रमुख उद्दिष्ट ग्रामपंचायतीच्या वार्षिक अंदाजपत्रकाची माहिती विद्यार्थ्यांना करूण देणे हे होते. या भेटीमध्ये विभागातील कु. अनुष्का सुनिल कांबळे, कु. श्रुतिका संजय कांबळे, श्री. विनायक प्रकाश राडे व श्री. अक्षय संजय कांबळे या विद्यार्थ्यांसोबत प्रा. एस. आर. कुंडले सहभागी झाले होते. भेटीदरम्यान पुणदी गावचे सरपंच श्री. संपत पाटील यांनी आर्थिक वर्ष 2019–2020 मध्ये ग्रामपंचायतीस शासनाकडून प्राप्त झालेला निधी आणि त्याचे वितरण याची माहिती दिली. तसेच आर्थिक वर्ष 2020–2021 मधील नियोजीत कामाची खर्चासह माहिती विद्यार्थ्यांना दिली. या अभ्यास भेटीदरम्यान पुणदी गावचे उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. सदरची अभ्यास भेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. एस. ए. भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

**फलनिष्पत्ती:–**
विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग असलेल्या ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक याचे ज्ञान मिळाले.

**लाभार्थी:–**
**21**





प्राचार्य
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज
रामानंदनगर (बुर्ली)